क्र.का.५/अभिनिर्णय/प्र.क्र. २७ /१२/ ८०४१२
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
नविन प्रशासकीय इमारत ,
तळ मजला, पुणे-१.
दिनांक :- २३ /०८/२०१२

# परिपत्रक

**विषय :- मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ४१ खाली प्रमाणपत्र दिल्यानंतर नविन मुद्दा समाविष्ठ करण्याबाबत ...**

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१ अन्वये एखाद्या दस्तऐवजास किती मुद्रांक शुल्क देय आहे, यासाठी दस्तातील पक्षकार अभिमत घेण्याकरिता मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे अभिनिर्णयासाठी अर्ज दाखल करुन मुद्रांक शुल्क भरून घेण्याची तरतूद आहे. तसेच कलम ३४,३९ किंवा ४० खाली सुध्दा कमी पडलेला मुद्रांक शुल्क वसुल करण्याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी यांना अधिकार आहेत या कलमा व्दारे मुद्रांक शुल्क वसुल झाल्यानंतर कलम ४१ अन्वये प्रमाणपत्र देण्यात येते. त्यानंतर उक्त संलेखावर सदरच्या प्रमाणपत्राच्याखाली नमुद केल्याप्रमाणे ठसा उमटवावा.

**हे प्रमाणपत्र " मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अन्वये असलेल्या नियमान्वये निर्गमित केलेले आहे. परंतु उक्त दस्त नोंदणी साठी नोंदणी अधिका-यासमोर दाखल झाल्यास, नोंदणी अधिनियम १९०८ च्या अधिनियमातील तरतूदी नुसार नोंदणी अधिकारी दस्त नोंदणीची कार्यवाही करतील. " असा शेरा किंवा ठसा उमटवावा.**

सही/-XXX
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१.अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना.
२.सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
२/- आपल्या अधिनस्त सर्व नोंदणी अधिका-याकडून सदरच्या परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे सुचनांचे काटेकोर पालन होईल याची खात्री करावी.
३.सर्व सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
४.सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**निर्गमित,**

**सह नोंदणी महानिरीक्षक व**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.**